# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 30/01/2020**

**सभा सुचना क्रं. 25**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. 09/01/2020 चे रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.** | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०१/२०२० चे रोजीचे कायम केलेले इतिवृत्त मंजूर करणेंस सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 99 नुसार सन 2020-21 या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता कर व दर निश्चित करणे.** | **ठराव :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करून चर्चा केली असता सन २०२०-२१ साठी प्रशासनाने कर व कराचे दराचा प्रस्ताव मंजूरीसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास ही सभा शिफारस करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.ज्योती धोंडेकर सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी येथील वॉर्ड क्र.87 मध्ये एव्हरशाईन सिटी येथील वृंदावन कॉम्प्लेक्स ते ब्लूबेल अपा. पर्यंत पाईप गटार बांधणे कामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामी होणाऱ्या रक्कम रू. १५,२८,९५१/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 4. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी आचोळे कार्यक्षेत्रातील वसंत नगरी मैदानाला संरक्षक भिंत बांधणे व जॉगिंग ट्रक बनविणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामी होणाऱ्या रक्कम रू. ७४,४९,०४१/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.प्रकाश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 5. | **प्रभाग समिती अे विरार (प.) प्रभाग क्र.29 मध्ये बुध्दविहार लगत नाल्यासाठी आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू. २२,१३,२१३/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.हार्दिक राऊत  सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.29 मध्ये श्यामसरीता बिल्डींग लगत नाल्यासाठी आर.सी.सी भिंतीचे बांधकाम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू. २३,२३,८८२/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. मा.श्री.हार्दिक राऊत  सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.103 मधील लेवडी क्रॉस ते चुळणा मुख्य रस्त्या पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराच्या निविदाधारका सोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. नितेश मोहन मलवाणी ह्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशी नुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील  सूचक :- मा.श्रीम.ज्योती धोंडेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **प्रभाग समिती एच मध्ये वॉर्ड क्र.98 मध्ये दिनदयाल नगर येथे साईबाबा मंदिर ते राणा इलेक्टॉनिक्स येथे गटार करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन एच मध्ये वॉर्ड क्र.९८ मध्ये दिनदयाल नगर येथे साईबाबा मंदिर ते राणा इलेक्टॉनिक्स येथे गटार करणेचे र.रू. ४२,४४,८२४/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदरचे कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेवून निविदाची कार्यवाही/वर्तमान पत्रात जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी करणेस त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील  सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.108 मधील समर्थ बंगला ते मर्सी बंगल्यापर्यंत रस्ता साईडपट्टी खडीकरण व डांबरीकरण करणे** | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. विशाल डी.गुप्ता ह्यांची १६.४४ऽ कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली |

| | | |
|---|---|---|
| | याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराच्या निविदाधारका सोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशी नुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. ज्योती धोंडेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C मध्ये जागरुक नागरीक संस्था, वसई व यंग स्टार ट्रस्ट विरार यांच्या संयुक्त विद्यमाने फन स्ट्रीटचे आयोजन करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. प्रस्तावात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए,बी,सी, जागरूक नागरीक संस्था, वसई व यंग स्टार ट्रस्ट, विरार यांच्या संयुक्त विद्यमाने फन स्ट्रीटचे आयोजन करणेस व त्याकामी आवश्यक कामे महानगरपालिकेच्या मंजूर ठेकेदारांकडून करून घेण्यांत यावीत याकामी रक्कम रू. ४,००,०००/- (अक्षरी चार लक्ष मात्र) इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश चौधरी सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**